मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# येशूचे चमत्कार



लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Byron Unger; Lazarus

रूपान्तरकार: E. Frischbutter; Sarah S.

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2014 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

येशूने पुष्कळ चमत्कार केले. येशू हा खरोखर देवाचा पुत्र आहे हे दाखविण्यासाठी चमत्कार हे चिन्ह असे होते. लग्न समारंभात पहिला चमत्कार घडला. एक समस्या उद्भवली. सर्वांसाठी पुरेसा द्राक्षारस नव्हता.



येशूची आई मरिया हिने येशूला या समस्येविषयी सांगितले, आणि मग येशू जे काही सांगेल त्याप्रमाणे करण्यास तिने तेथील सेवकांना सांगितले.



येशूने त्यांना म्हटले, "हि भांडी पाण्याने भरा." "पाण्याने?" असे कदाचित त्यांनी विचारले असावे. होय, येशूला पाणीच हवे होते.



त्यानंतर येशूने तेथे काम
करणाऱ्या एका नोकराला,
एका मोठ्या भांड्यातील पाणी
काढून भोजन कारभाऱ्याकडे
नेऊन चाखून पाहण्यास
सांगितले. ते पाणी आता
द्राक्षारस बनले होते!
चांगला द्राक्षारस!
उत्तम द्राक्षारस
होता!



सर्व नोकर आश्चर्यचकित झाले. येशूने पाण्याचा द्राक्षारस केला होता. केवळ परमेश्वरच असा चमत्कार करु शकतो.





येशूने दुसरे चमत्कार देखिल केले. एके संध्याकाळी तो व त्याचे शिष्य पेत्राच्या घरि गेले. पेत्राची सासुबाई तापाने फार आजारी होती.

येशूने आजारी बाईच्या हाताला स्पर्श केला. त्याचक्षणी ती लगेच बरी झाली.
ती उठून येशूची व शिष्यांची सेवा करु लागली.



त्या संध्याकाळी जणूकाय सर्व शहर त्या घराच्या दारावर आले आहे असे वाटत होते. आजारी लोक आले – आंधळे, बहिरे, मुके, लुळे–पांगळे. ऐवढेच नव्हे तर त्या गर्दीत भुतग्रस्त लोक येशूला पाहून ओरडले. त्या दिवशी त्याने पुष्कळांना मदत केली.



देवाचा पुत्र, येशू, मदत करु शकला. येशूने मदत केली. जे कोणी त्याच्याकडे आले ते सर्व बरे झाले. जे लोक आयुष्यभर कुबड्यांचा आधार घेऊन चालत होते ते आता चालत, पळत, उड्या मारत होते.





कुष्ठ रोगाने कुरुप झालेले असे
इतर लोक देखिल आले.

येशूने त्यांना बरे केले आणि
ते पुर्विसारखे पुर्ण आणि
शुध्द् झाले.



भुत लागलेले स्त्री–पुरुष
येशू समोर उभे राहिले.
त्यांना त्याने त्यांच्यातून
निघून जाण्याची आज्ञा
केली. भुतांनी येशूची
वाणी ऐकली, भुत
त्या स्त्री–पुरुषांच्या
शरीरातून निघून गेले,
भितीग्रस्त आणि दुःखी
लोकांना शांती व
आनंद मिळाला.



गर्दीत, चार माणसे त्याच्या आजारी मित्राला येशू जवळ नेण्यासाठी मदत करण्याचा प्रयत्न करत होते. परंतू ते त्याला येशू जवळ नेऊ शकत नव्हते. आता ते काय करतील?



ते चार विश्वासू मित्र त्यांच्या आजारी मित्राला घेऊन घरावर चढले, आणि त्यांनी घराचे छप्पर बाजूला करुन येशूजवळ त्यांच्या मित्राला खाली सोडले. आता तो येशू जवळ होता.



चार मित्रांत विश्वास आहे; हे येशूने पाहिले. येशू त्या आजारी मनुष्याला म्हणाला, "तुझ्या पापांची क्षमा झाली आहे. तुझा बिछाना घे आणि चालू लाग." तो मनुष्य चांगल्यारितीने, सदृढ मनुष्यासारखा उठून उभा राहिला. येशूने त्याला बरे केले.





थोड्याच वेळात, येशू त्याच्या शिष्यांसोबत नावेत होता. भयंकर भितीदायक वादळाने समुद्र खवळला होता. येशू झोपला होता. घाबरलेल्या शिष्यांनी "प्रभूजी, आम्हांला वाचवा, आम्ही बुडत आहोत, आमचा नाश होत आहे!" अशी आरोळी मारली.

"शांत हो" अशी येशूने लाटांना आज्ञा केली. तत्काळ समुद्र शांत झाला. "हा मनुष्य आहे तरी कोण?" अशी कुजबुज शिष्य आपसांत करु लागले. कारण समुद्र आणि वारा देखिल याचे ऐकतात. येशू हा देवाचा पुत्र आहे असा त्यांचा विश्वास होता, कारण त्याचे चमत्कार त्याचे गौरव प्रकट करित होते. शिष्यांना हि गोष्ट सुरवातीला माहित नव्हती परंतु येशू लोकांमध्ये देवाची सेवा करित असता याच्यापेक्षा अधिक मोठ्या चमत्कारांना शिष्य पाहणार होते.



येशूचे चमत्कार

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

मत्तय ८-९, मार्क १-२, मार्क ४, लूक ४,
लूक ८, योहान २

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16